# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 19/11/2019 (मंगळवार)
# (सायंकाळ)

---

## सर्पदंशामुळे मृत्यु

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत मौजा 08 खापा तांडा शिवार येथे दिनांक 13/11/2019 चे 09.00 वा. दरम्यान धनराज रतन जाधव, वय 39 वर्ष, रा. खापा तांडा हे शेतात फवारणी करीता गेले असता शेतातील पराटीत असलेल्या सापाने त्यांच्या उजव्या पायाला चावा घेतला. त्यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. संबंधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलीस नाईक श्री. राजेन्द्र मेश्राम पो.स्टे. कोंढाळी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कोंढाळी येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस शिवाई गौरव मोकडे हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 6 कि.मी. अंतरावरील मौजा खुरजगाव फाटा येथे दिनांक 17/11/2019 चे 23:30 वा. दरम्यान एमपी– 28/सीए–9590 क्रमांकाच्या कारचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच– 40/पी–2493 क्रमांकाच्या ऑटोला धडक दिली. या अपघातात कामगार नामे– 1) गिरीश हैरंग, 2) पुरूषोत्तम घोडसे, 3) दिलीप टुले, 4) किरण मंगरूले, 5) प्रमोद भागवत, 6) कुणाल भुडके, 7) नितीन सातपुते, 8) रविन्द्र शेंबेकर, 9) गणेश घोडसे, 10) मुन्ना क्षिरसागर, 11) बळीराम थोटे, 12) किशोर येरपुडे व फिर्यादी हे जखमी झाले. तर अनिल दशरथ बनकर, वय 35 वर्ष, रा. चिचपुरा सावनेर यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शेषराव भगवान धांडोळे(ऑटो चालक), वय 52 वर्ष, रा. सावनेर, वार्ड क्र. 7 यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री अर्जुन राठोड 8605585606 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर